RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ७३(२)] बुधवार, सप्टेंबर २, २०२६/भाद्रपद ११, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ११३**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उप विभागीय अधिकारी, पनवेल यांजकडून

**अधिसूचना**

**भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ/भूसं/कात-५/रोहींजण/कलम १९ ची अधि.प्रसिद्धी/२०२६/९७००५३५.—याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना दिनांक २१/०४/२०२५ अन्वये कलम ११ ची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेली अधिसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

**गाव : रोहिंजण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| अनुक्रमांक | स.नं./हि.नं. | संपादित क्षेत्र (हे.आर.मध्ये) |
|---|---|---|
| १ | ६४/३+४ | ०.०८.५० |
| २ | ६६/१ | ०.२३.८४ |
| ३ | ६८/३ | ०.२३.३० |
| ४ | ७३/२ | ०.००.०६ |
| ५ | ७९/१+४ब | ०.०२.७५ |
| ६ | ७९/१+४क | ०.०७.७२ |
| **एकूण** | | **०.६६.१७** |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**अधिसूचना प्रकल्पाचे नाव** : पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे-रोहिंजण, क्षेत्र **०.६६.१७ हे. आर.** येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मंजूर केलेल्या भाडे तत्वावरील घरांच्या प्रकल्पांना रस्ते व इतर सोई सुविधा उपलब्ध करून देणे अंतर्गत मंजूर विकास योजनेतील मौजे-रोहिंजण ते आडिवली या २४.०० मी. रस्ता रुंदीकरण करणेकामी प्रयोजन.

**निर्गमित प्रकल्पकार्याचे वर्णन** : पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे-रोहिंजण, क्षेत्र **०.६६.१७ हे. आर.** येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मंजूर केलेल्या भाडे तत्त्वावरील घरांच्या प्रकल्पांना रस्ते व इतर सोई सुविधा उपलब्ध करून देणे अंतर्गत मंजूर विकास योजनेतील मौजे-रोहिंजण ते आडिवली या २४.०० मी. रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

**करण्यापूर्वी समाजाला मिळणारे लाभ** : पनवेल शहराचे औद्योगिक महत्त्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

## अनुसूची-तीन

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** : **निरंक**

## अनुसूची-चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :** पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे-रोहींजण, क्षेत्र **०.६६.१७ हे. आर.** येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मंजूर केलेल्या भाडे तत्त्वावरील घरांच्या प्रकल्पांना रस्ते व इतर सोई सुविधा उपलब्ध करून देणे अंतर्गत मंजूर विकास योजनेतील मौजे-रोहिंजण ते आडिवली या २४.०० मी. रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. या जमिनी संपादन करण्यामुळे केवळ ६ खातेदार बाधीत होत आहेत व खातेदार विस्थापित होत नाही. पनवेल शहराचे औद्योगिक महत्त्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यात आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे सार्वजनिक रहदारीसाठी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सार्वजनिक हितासाठी भूसंपादन अधिनियम, २०१३ कलम ९ व ४० मधील तरतुदींनुसार सामाजिक परिणाम निर्धारणाच्या अभ्यासाची आवश्यकता नाही.

सदर भूसंपादन प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी.

**टिप.**—उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी, उप विभाग पनवेल यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**ठिकाण :** पनवेल,
दिनांक ३१ ऑगस्ट २०२६.

**पवन चांडक,**
उप विभागीय अधिकारी, पनवेल
उप विभाग, पनवेल.

## BY THE SUB DIVISIONAL OFFICER PANVEL, SUB DIVISION PANVEL

*NOTIFICATION*

Right To Get Appropriate Compensation And Transparency In Land Acquisition, Rehabilitation, Resettlement Act, 2013.

क्रमांक उविअ/भूसं/कात-५/रोहींजण/कलम १९ ची अधि.प्रसिद्धी/२०२६/९७००५३५.— Whereas, the District Collector of Raigad District, with proper governance, is entitled to appropriate compensation for land acquisition, rehabilitation and resettlement, and by sub-section (*1*) of section 11 of the Right to Transparency Act, 2013 (30 of 2013) (hereinafter referred to as the Act) by using the powers, the notification, dated 21/04/2025, has been drawn in the initial notification and by that notification is made, along with a detailed description of the land done more in the attached Schedule A, Schedule two requires or is likely to require a more detailed specific public purpose.

And, after considering the report given by sub-section (*2*) of section 15, if any, by the Collector of Raigad District, it is convinced that the said land needs to be acquired for the said public purpose. Therefore, under the provisions of sub-section (*1*) of section 19 of the said Act, it is hereby declared that the said land is required for the public purpose.

And whereby the areas described in more detail in Schedule III are designated as Rehabilitation Areas for the purpose of rehabilitation and rehabilitation of the affected families, the summary of the Rehabilitation and Resettlement Scheme is specified in Schedule Four.

AND WHEREAS, the District Collector under Clause (c) of Section 3 of the said Act is deputing the Sub Divisional Officer Panvel, Sub Division Panvel, (Old Thana Naka) to perform the functions of the Collector under the said Act;

*Schedule — I*

**Description of the Land**

**Village :— Rohinjan, Tal. :— Panvel, District :— Raigad**

| Sr. No. | Survey/Gat No. | Area in Hectares |
|---|---|---|
| 1 | 64/3+4 | 0.08.50 |
| 2 | 66/1 | 0.23.84 |
| 3 | 68/3 | 0.23.30 |
| 4 | 73/2 | 0.00.06 |
| 5 | 79/1+4B | 0.02.75 |
| 6 | 79/1+4C | 0.07.72 |
| **Total** | | **0.66.17** |

*Schedule-II*

**Notification: Name of the project :** The rental basis houses approved by the Mumbai MetropolitanRegion Development Authority in Mouje-Rohinjan, area **0.66.17 Hectre** within the Panvel Municipal Corporation limits To provide roads and other amenities to the projects. Purpose of widening the 24.00 m. road from Mouje-Rohinjan to Adivali in the approved development plan.

**Summary of Social Impact Assessment :** Roads and other amenities are available for rental housing projects approved by the Mumbai Metropolitan Region Development Authority in Mouje-Rohinjan, area **0.66.17 Hectre** within the Panvel Municipal Corporation limits. It is necessary to widen the 24.00 m. road from Mouje-Rohinjan to Adivali in the approved development plan under the scheme.

*Schedule — III*

Compelling the displacement of the affected person : Nil.

*Schedule — IV*

Summary of Social Impact Assessment : Provision of roads and other amenities to the rental housing projects approved by the Mumbai Metropolitan Region Development Authority at Mouje-Rohinjan, area **0.66.17 Hectre** within the Panvel Municipal Corporation limits. It is necessary to widen the 24.00 m. road from Mouje-Rohinjan to Adivali in the approved development plan. Only 6 account holders are being affected by the acquisition of these lands and the account holder is not displaced. Due to the industrial importance and urbanization of Panvel city, as well as its rapid development and expansion, the proposed area will not be acquired. The progress of the society will not be possible. Therefore, it is necessary to widen the road for public traffic. Therefore, in the public interest, Section 9 of the Land Acquisition Act, 2013. As per the provisions of Section 40, there is no requirement for a Social Impact Assessment Study.

The amendment to chapter III under Close 10 A of the LAAR (Maharashtra & Amendment) Act, 2018.

*Note.*—The layout plan of the said land can be inspected at the office of the Sub-Divisional Officer, Panvel Sub-Division.

Panvel,

Dated 31st August 2026.

PAVAN CHANDAK,

Sub-Divisional Officer, Panvel
Sub Division, Panvel.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.